
Read India
An Imprint of Pratham Books

# सिंह फिरायला गेला

पारो आनंद
अविशेक सेन




RGF Pratham

# सिंह फिरायला गेला

लेखिका
**पारो आनंद**

चित्रांकन
**अविशेक सेन**

मराठी अनुवाद
**डॉ. उत्कर्षा मनिष**



पाऊस सुरू झाला आणि थांबण्याचे नाव घेत नव्हता. आकाशातून पाण्याचे मोठे मोठे थेंब पडत होते, आणि सर्वांच्या मनात काळ्या ढगांप्रमाणे घर करत होते. जणू काही आकाश रडत आहे असे भाव सर्वांच्या चेहऱ्यावर होते.

तरीही पाऊस थांबला नाही. सर्वजण घरी उदास बसले होते. त्यांना कंटाळा आला होता.

"आपल्याकडे काही करण्यासारखे असते तर?" गीती आळस देत म्हणाली.

"आपल्याबरोबर काहीच मजेदार होत नाही," विकी बोलला.

आईने बाहेर पावसात भिजायला मनाई केली होती. पण मुलांना वाईट वाटू नये म्हणून गरमागरम, कुरकुरीत भजीही केली होती. मुलांनी बटाटा, कांदा, पालक, कोबी वगैरे कापायला मदत केली.

भजी अतिशय रुचकर झाली होती. हिरव्या चटणीबरोबर चव घेत, मिटक्या मारत मुलांनी ती खाल्ली. पोटभर खाऊन झाल्यावर राहिलेली भजी एका टेबलावर झाकून ठेवली, म्हणजे दुसऱ्या दिवशी न्याहारीला थंड लस्सी बरोबर शिळी चपाती आणि भजी खाता येतील.

"विचार करा, इतक्या पावसात पशु-पक्षी काय करत असावेत?" गीतीने विचारले.



"काय करत असतील? पिंजऱ्यात बसून राहत असतील, आणखी काय?"

"नाही बुद्धू, मी जंगली जनावरांबद्दल बोलत होते. जंगलात सिंह, झाडावर बसलेले पक्षी इतक्या पावसात काय करत असतील?"

"कमीत कमी ते बंदीवासात तर नाही. पिंजऱ्यात बंद असलेले प्राणीसंग्रहालयातील जनावरांचे हाल काय होत असतील, विचार करा. बिचारे!"






आणि खरंच प्राणीसंग्रहालयातील प्राणी घाबरलेले होते. छोटे वा मोठे प्राणी असो इतके भिजणे कोणत्याच प्राण्याला पसंत नव्हते. पण पाऊस थांबण्याचे नाव घेत नव्हता. सर्व काही जास्तच भिजत चालले होते. सिंहाच्या आवाराच्या चारही बाजूला जी दरी होती ती सुद्धा पाण्याने भरली.



म्हातारा सिंह आपल्या आवाराच्या बाहेर कधीच गेला नव्हता. असा पाऊस पाहण्याची ही त्याची पहिलीच वेळ होती! दरी पाण्याने भरलेली





पाहून त्याच्या मनात एक विचार आला. आपले नाक मुरडत त्याने आपला एक पंजा पाण्यात घातला आणि दीर्घ श्वास घेऊन दरीतल्या पाण्यात उतरला.

सुरुवातीला तो बुडायला लागला. घाबरला- पाण्यात बुडून मरणार तर नाही ना?

पण नंतर त्याचे मोठे डोके पाण्याबाहेर आले आणि पोहत तो आवाराच्या भिंतीपर्यंत पोहचला. सिंहाने आपले मोठे आणि मजबूत पंजे भिंतीवर ठेवले आणि मनातल्या मनात 'जोर लगाके हई-शा' असे बोलला. भिंत ओलांडून दुसऱ्या बाजूला पोहचला. भिंतीच्या दुसऱ्या बाजूला स्वातंत्र्य होते. तो कुठेही फिरू शकत होता, कुठेही जाऊ शकत होता. काहीही करू शकत होता. आज सिंह महाराज काहीतरी अनोखं करणार होते!




खूप रात्र झाली होती, आणि प्राणीसंग्रहालयातील पहारेकरी गाढ झोपले होते. कोणीच सिंहाला बाहेर पडलेले पाहिले नाही.

आज सिंह आपल्या मर्जीचा मालक होता. हळूच, अगदी दबक्या पावलांनी तो अस्वलाच्या पिंजऱ्यापाशी गेला. जेव्हा दचकून अस्वल झोपेतून उठले तसे सिंहाने त्याला डोळा मारला.


8659

एक-एक करून सर्व पिंजऱ्यांना पाहून सिंहाला कळले की, स्वातंत्र्य किती चांगले असते आणि त्याच्या मनात एक विचार आला. तो पूर्णपणे स्वतंत्र होऊ इच्छित होता. पण असे स्वातंत्र्य काय कामाचे जेव्हा तो अजूनही प्राणीसंग्रहालयाच्या भिंतीमध्ये कैद होता? तो सर्व पिंजऱ्यात रस्ता विचारत प्राणीसंग्रहालयाच्या प्रवेशद्वारापाशी पोहचला.



अचानक त्याला माणसाचा वास आला. हळूच त्याने तिकीट खिडकीतून डोकावले आणि त्याला लाठी घेतलेला एक चौकीदार बसलेला दिसला. सिंहाला माहीत होते तो त्याला प्राणीसंग्रहालयाच्या बागेच्या बाहेर असंच फिरायला नाही देणार, म्हणून लपूनच त्याने काही वेळ चौकीदाराला पाहिले.

काही क्षण गेले आणि चौकीदार हलला नाही.



8659

सिहाला घारल्याचा हळू आवाज आला. जेव्हा त्याला पूर्ण पटले की चौकीदार झोपला आहे तेव्हा तो तिकीट खिडकीच्या समोरून निघाला. ''हुरऽऽऽ,'' चौकीदार झोपेत बडबडला. एक क्षण सिंह इतका घाबरला की त्याने जोरात डरकाळी फोडण्यासाठी तोंड उघडले... पण नंतर चुपचाप दबक्या पावलांनी हळूहळू प्राणीसंग्रहालयाच्या मोठ्या दरवाजातून बाहेर पडला. तो सिंह पहिल्यांदा लांब, काळ्या आणि ओल्या रस्त्यांवर चालत होता. आश्चर्याने त्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या उंच इमारतींकडे पाहिले. प्रत्येक सुक्या जागेत माणसांना झोपलेले पाहून तो थोडासा हैराण झाला. अशाच एका कांबळीमध्ये झोपलेल्या छोट्या मुलाचा त्याने वास घेतला. त्या मुलाने आपले मोठे डोळे झोपेतून उघडत बोलला, ''बाबा! सिंह फिरायला आला आहे!'' त्याचे वडील झोपेतच बोलले, ''तो जाईल. तू झोप बघू.''



सिंह चालतच होता. तो एवढे कधीच फिरला नव्हता. तो आता बाजारात पोहचला. तिथेही सर्व गाढ झोपले होते. तो एका दुकानाच्या चमकत्या खिडकीत डोकावला. त्यात ठेवलेल्या वस्तूंकडे त्याने थोडावेळ पाहिले. एवढे सुंदर रंग त्याने आधी कधीच पाहिले नव्हते.

तो पुन्हा चालू लागला. एवढा वेळ चालून तो फार थकला होता. तो आणखी भिजला होता, आणि त्याला खूप भूक लागली होती.



अचानक त्याला गरमागरम भज्यांचा वास आला. त्याने पूर्वी कधी भजी खाल्ली नव्हती, म्हणून हा वास कसला आहे हे तो ओळखत नव्हता. पण एवढ्या खमंग वासाकडे तो दुर्लक्ष कसे करू शकेल?


वास काढत तो गीती आणि विकीच्या खिडकीपाशी आला. खिडकी उघडी होती, आणि तो पटकन आत आला. त्याने मुलांना आपल्या गरम, मऊ गाद्यांवर झोपलेले पाहिले. त्यालाही अचानक झोप येऊ लागली पण त्याआधी तो वास कुठून येत आहे, हे शोधायचे होते.

त्याच्या धारधार नाकाने त्याने त्या वासाचे मूळ पटकन शोधून काढले. भजी अतिशय स्वादिष्ट होती. रोजरोज दुर्गंधी असलेले कच्चे मांस खाणाऱ्या सिंहाला नरम-नरम भजी खूप आवडली. त्याने ताटली चाटून पुसून साफ केली.



पोट भरून झाल्यावर सिंहालाही खूप झोप येऊ लागली. आज प्रथमच तो पाण्यात पोहला होता आणि प्रथमच त्याने एवढ्या लांबचा फेरफटका मारला होता. तो पुन्हा मुलांच्या खोलीत गेला. आधी त्याने विकीच्या बिछान्यावर झोपण्याचा प्रयत्न केला. पण एका मोठ्या सिंहासाठी तो खूप छोटा होता.

नंतर त्याने गीतीच्या बिछान्यात घुसण्याचा प्रयत्न केला. तिथेही तो पुरत नव्हता. शेवटी तो पलंगाखाली गेला. एक मोठ्या धष्टपुष्ट सिंहाला झोपण्यासाठी ती जागा अगदी बरोबर होती. तो आरामात तिथे झोपला.



दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा आई उठली तेव्हा भजी गायब होती.
"विकी, गीती, तुम्ही रात्री सर्व भजी खाल्ली का?"


8659

"आम्ही, नाही आई, बिलकूल नाही."
"तुम्ही नाही तर कोण खाणार? खोटं बोलू नका."
"हुऽऽऽ मग सिंहानी खाल्ली असतील."
"कुठला सिंह? गीती, मूर्खासारखं काही बडबडू नकोस."
"नाही आई, आमच्या पलंगाखाली खरोखरंच एक सिंह आहे."
"काय!?!" आई जोरात किंचाळली. धावत जाऊन पलंगाखाली सिंहाला शोधायला गेली.
शोधून ही सिंह सापडला नाही.
"शी! मुलांनो तुम्ही मला उगाचच घाबरवले. इथे सिंह वगैरे काही नाही. मी पण तुमचे बोलणे पटकन मानले!"




"आई पण खरंच इथे सिंह होता! अगदी नक्की! बघ गालिचावर सिंहाच्या पायाचे ठसे आहेत!"

"आणि आमचे बिछानेही भिजले आहेत!" "आणि माझ्या कांबळीवर सिंहाचे केसही आहेत. बिचारा पाऊसापासून वाचवण्याकरता आत आला असेल."





शेवटी आईला मानावेच लागले सिंह आला होता म्हणून. पण खूप शोधूनही तो सापडला नाही. माहीत आहे का? मस्त झोप झाल्यावर त्या समजूतदार सिंहाने विचार केला की कोणी घाबरण्याआधीच मला प्राणीसंग्रहालयात परतले पाहिजे.




सूर्य उगवताच तो पुन्हा त्याच रस्त्याने परत गेला. रस्त्यात त्या छोट्या मुलाखेरीज त्याला कोणीही पाहिले नव्हते. त्या मुलाने त्या सिंहाच्या नाकावर थापटून विचार केला की मोठी लोकं लहान मुलांचे बोलणे मानतच नसतील तर त्यांना सांगून काय फायदा की सिंह फिरायला आला होता?

आणि प्राणीसंग्रहालयाच्या तिकीट खिडकीच्या चौकीदाराच्या बाजूने निघत आपल्या आवारात आला. आज खरंच खूप मजा आली. आपल्या घरी पोहचून तो फारच खूश होता.




जसा पाऊस थांबला तसे विकी आणि गीती प्राणीसंग्रहालयात गेले. सिंहाच्या आवाराच्या जवळ जाऊन कुजबुजू लागले. सिंहाने ही त्यांना ओळखले आणि जोरात डरकाळी फोडून आपल्या मित्रांचे आभार मानले!



पुढच्या वेळी जेव्हा पाऊस येईल तेव्हा कदाचित सिंह तुमच्या घरी येईल. त्याच्यासाठी तुम्ही गरमागरम भजी ठेवायला विसरू नका!
(ही गोष्ट एका सत्यकथेवर आधारित आहे. एकदा, राजस्थानमधल्या जयपूरमध्ये, एवढा पाऊस पडला की खरोखरंच एक सिंह आपल्या पिंजऱ्यातून बाहेर पडून फिरू लागला. बिचारा एवढा भिजला की नंतर तो टिकीट-घरात जाऊन बसला-जिथून त्याला पकडून पुन्हा पिंजऱ्यात टाकण्यात आले. म्हणून विचार केला की या गोष्टीत त्याला फिरायला जाण्याची एक संधी मिळू दे.

(काही मगरीही आपल्या आवाराबाहेरील दरीतून पोहत बाहेर आल्या होत्या-पण ती गोष्ट पुन्हा कधी तरी...)





माझं नाव रेणू आहे. मी प्रथम वाचनालयात दररोज जाते. दीदीने घेतलेले खेळ खेळायला आवडतात. मला चित्रेही काढायला आवडतात.
तुम्ही हे पुस्तक विकत घेतल्याबद्दल मी तुमची आभारी आहे. यामुळे माझ्या वाचनालयाला माझ्यासाठी आणि माझ्या मित्रमैत्रिणींसाठी नवीन पुस्तके घेता येतील.

**पारो आनंद** यांनी लहान मुलांसाठी अनेक पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांना अनेक नामांकित पुरस्कारही मिळाले आहेत. त्यांच्या लघुकवितांचा संग्रह प्रकाशित झाला आहे. लहान मुलांच्या साहित्याबद्दल त्यांचे अनेक लेख बहुतांश वर्तमानपत्रात छापले गेले आहेत, तर दूरदर्शनवर आणि आकाशवाणीवर, इतकेच काय तर लंडनच्या बी. बी. सी. वरही त्यांनी यावर कार्यक्रम केले आहेत. त्या लिटरेचर इन ॲक्शन हा कार्यक्रम चालवतात, ज्यात लहान मुलांना, शिक्षकांना आणि पालकांना साहित्याचा उपयोग, सर्वांगीण विकासासाठी कसा करायचा हे शिकवतात. आंतकवादाने पीडित मुलांसाठी सध्या त्या राजीव गांधी फाउन्डेशन मध्ये काम करतात.

**अविशेक सेन** यांच्याकडे पेटींग क्षेत्रात, कलाभवन शांती निकेतन येथील प्रथम श्रेणीची पदव्योत्तर पदवी आहे. १९९९ साली त्यांना नॅशनल स्कॉलर्सचा पुरस्कार मिळाला. ते स्वतःचा उल्लेख उस्फूर्त तरुण असा करतात. ते चित्रकार आहेत पण त्यांना लहान मुलांच्या पुस्तकांचे चित्रांकन करायलाही आवडते.

पाऊस पडायला लागला की तुम्ही भोलानाथला अनेक प्रश्न विचारू शकतात... बरोबर की नाही?
या गोष्टीतल्या सिंहाला तरी नक्कीच असे वाटते!
प्राणीसंग्रहालयातला एक सिंह पावसाळतल्या दिवशी सुट्टी घेतो... आणि गोष्टीतल्या इतर मुलांसारखी मजा करतो.
नाहीतरी पारो आनंदच्या मते ही गोष्ट एका खऱ्या घडलेल्या गोष्टीशी मिळती जुळती आहे.

आमच्या वेगवेगळ्या भाषांतील शीर्षकांच्या संपूर्ण माहितीसाठी
www.prathambooks.org ला लॉगऑन करा

प्रथम बुक्स ना-नफा प्रकाशक आहेत जे उत्तम दर्जाची आणि स्वस्त दरात भारतातील विविध भाषांमध्ये लहान मुलांसाठी पुस्तके काढतात.

Age Group : 11-14 years
Sivnha Phiraaylaa Gelaa (Marathi)
MRP Rs. 25.00

ISBN 978-81-8263-670-1
9788182636705